## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३२०/२०२२ मधील निशाणी ६ वरील आदेश.

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दरम्यानची पोटगी मिळणेसाठी केला आहे. अर्जदाराचा मूळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२,१७,१८,१९,२०,२२ व २३ प्रमाणे विविध मागण्यांसाठी केला आहे.

**अर्जदाराचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे.**

**२.** अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि. ०४.०६.२०१४ रोजी हिंदू धर्मशास्त्र चालीरिती रुढीपरंपरानुसार झालेला आहे. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ च्या मामाची मुलगी आहे. सदर विवाहसंबंधातून त्यांना कोणतेही अपत्य नाही. अर्जदाराच्या वडिलांनी लग्नात सामनेवाला क्र. १ यास दीड तोळा सोन्याची अंगठी, कपडालत्ता व वरदक्षिणा म्हणून रु.१५,०००/- दिले आहे व सदर विवाहावेळी रु.३,००,०००/- इतका खर्च केला आहे. सामनेवालांनी अर्जदारास वेळोवेळी मानसिक व शाररिक त्रास दिलेला आहे. दि. १०.०६.२०१४ रोजी सत्यनारायणाच्या पूजेदिवशी अर्जदाराच्या वडिलांनी रु.६०,०००/- च्या संसारोपयोगी वस्तु सामनेवाला यांना दिलेल्या आहेत. लग्नानंतर सामनेवाला यांनी अर्जदार हिला काही काळ व्यवस्थित नांदविले, त्यानंतर तिला शारीरिक व मानसिक त्रास दिला. तसेच तिच्या शिक्षणास प्रतिबंध घातला. अर्जदाराची मेडिकल दुकान सुरु करण्याची इच्छा होती. दि. ०९.११.२०१४ रोजी अर्जदाराचे मेडीकल दुकानाचा परवाना पोस्टाने प्राप्त झाला असता त्याची तिला माहिती होऊ दिली नाही. सामनेवाला क्र. १ याला दारुचे व्यसन होते व तो दारु पिऊन अर्जदारला मारहाण करीत असे. दि. ०२.०४.२०१५ रोजी सामनेवाला क्र.१ याने दारुच्या नशेत अर्जदाराला घरातील बाथरुममध्ये कोंडून ठेवले होते, तसेच तिला मारहाण करुन तिच्याशी गैरवर्तन केले होते. अर्जदाराने सदरची बाब तिचे वडील व चुलत्यांना सांगितली असता त्यांनी सामनेवाला यांना

विचारणा केली असता त्यांनी अर्जदार हिला माहेरी घेऊन जाण्यास सांगितले. त्यानंतर मध्यस्थांमार्फत बैठक होऊन सामनेवाला क्र. १ पुन्हा असा प्रकार करणार नसल्याची हमी देऊन अर्जदारास नांदण्यास घेऊन गेला.

३. पुढे अर्जदार असे कथन करते की, अर्जदार ही सामनेवाला यांच्यासोबत पंढरपूर येथे राहत होती. अर्जदाराला जबरदस्तीने मूल होण्याकरीता अघोरी उपचार घेण्यास भाग पाडले. सामनेवाला क्र.२ व ३ यांनी दि. ०८.०७.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन अनोळखी व्यक्ती आयुर्वेदीक डॉक्टर असल्याचे सांगितले व सामनेवाला क्र.१ व अर्जदार यांना बेशद्ध होण्याचे औषध दिले. त्यानंतर अर्जदार तीन तास बेशुद्ध अवस्थेत बंद खोलीत होती. सदर प्रकाराबाबत अर्जदाराने विचारणा केली असता सामनेवाला क्र. १ ने भांडण करुन तिला मारहाण केली. दि.२८.०९.२०२१ रोजी सामनेवाला यांनी अर्जदारास मारहाण करुन हाकलून दिले.

४. सामनेवाला क्र.३ हा सेवानिवृत्त असून त्यास दरमहा रु. ६०,०००/- इतके निवृत्तीवेतन मिळते. तसेच त्याच्या नावावर वाखरी, मोहोळ व पंढरपूर येथे शेतजमिनी असून त्यापासून त्यांना भरपूर उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र. १ यास शेती व नोकरीपासून दरमहा रु.१,००,०००/- इतके उत्पन्न मिळत असून त्याच्यावर कोणीही अवलंबून नाही. अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नाही. सबब, अर्जदार हिस दैनंदिन खर्च चालविणेदेखील अशक्य झाले आहे. मूळ अर्जाचा निकाल लागण्यास बराच अवधी लागणार आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज दरम्यानचा पोटगी मिळण्यासाठी दाखल केला असून सामनेवाला क्र. १ ने अर्जदारास दरमहा रक्कम रु.३०,०००/- अंतरीम पोटगी देण्याचा आदेश होण्याकरिता दाखल केला आहे.

**५.** सामनेवाला क्र. २ ते ४ यांनी निशाणी क्र. १७ वर मूळ अर्जास व प्रस्तुतच्या अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जदार ही सामनेवाला क्र. २ ची भाची आहे. सामनेवाला क्र. ३ हे भारत पेट्रोलियममध्ये नोकरीस होते व त्यातून त्यांनी सामनेवाला क्र.१ व ४ यांचे शिक्षण केले. सामनेवाला क्र. १ चे व्यसन व त्याच्या कुटुंबाची पूर्णपणे माहिती अर्जदारास होती. लग्नानंतर अर्जदार सामनेवालाकडे नांदण्यास आली परंतु ती सामनेवाला क्र. १ यास व्यसनापासून दूर करण्यास व नोकरी करण्यास कोणताही रस दाखवला नाही. अर्जदार माहेरी गेली असता तिला नांदविण्याकरीता सामनेवाला आणत असे. अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांना मूल व्हावे म्हणून सामनेवाला क्र. २ व ३ यांनी त्यांच्यावर खर्च करुन उपचार केला परंतु अर्जदार ही त्यांचा वारंवार अपमान करीत असे व भांडण काढत असे. सामनेवाला क्र. २ व ३ यांची संपत्ती मिळवण्याचा अर्जदाराचा उद्देश होता. सामनेवाला क्र. ४ ही सासरी असून द्वेषबुध्दीने तिला सामील केले आहे. सामनेवाला क्र. १ हा व्यसनाधीन असून तो सामनेवाला क्र. २ व ३ यांना शिवीगाळ व मारहाण करीत असे, तसेच त्याच्यावर मुक्तागंण पुणे येथे उपचार चालू आहेत. सामनेवाला क्र. २ व ३ हे तडजोडीकरीता अर्जदाराच्या आईवडिलांकडे गेले असता त्यांनी सामनेवाला क्र. २ व ३ यांना मारहाण केली त्यामुळे सामनेवाला यांनी पोलीस स्टेशन मंगळवेढा येथे फिर्याद दिली असता अर्जदाराने प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. सामनेवाला यांनी अर्जदाराचा कोणताही शारीरिक व मानसिक छळ केलेला नाही व ती स्वतः माहेरी जावून राहिली आहे. अर्जदाराने दिलेल्या तक्रारीशी सामनेवाला यांचा कोणताही संबंध नाही. अर्जातील नमूद मिळकती या सामनेवाला क्र. २ व ३ यांच्या स्वकष्टार्जित व वैयक्तीक मालकीचे मिळकती आहेत, त्यामध्ये अर्जदाराचा कोणताही अधिकार नाही. करीता, अर्ज

नामंजूर करण्याची विनंती सामनेवाला यांनी केली आहे.

६. सामनेवाला क्र. १ याने निशाणी क्र. २१ वर मूळ अर्ज व प्रस्तुत अर्जास त्याचे म्हणणे दाखल केले असून त्याने सामनेवाला क्र. २ व ४ यांनी दिलेले म्हणणे स्विकारत असल्याचे कथन केले आहे. त्याचे असे कथन आहे की, त्याचे शिक्षण व व्यसनाबाबत अर्जदारास माहिती असूनही तिने त्याला स्वीकारले आहे. लग्नानंतर अर्जदार इस्टेट तिच्या नावावर करण्यासाठी त्यास नेहमी त्रास देत असे. त्याने अर्जदाराचा कधीही छळ केला नाही अथवा मारहाण केली नाही व कसलीही मागणीदेखील केलेली नाही. त्याने अर्जदारास नोकरी करण्यास व स्वतंत्र व्यवसाय सुरु करण्यास कोणताही अडथळा केलेला नाही. अर्जदार स्वतः मूल होऊ न देता सामनेवाला क्र. १ कडे दोष आहे असे सांगून त्याची नाचक्की केली आहे. त्यामुळे तो मानसिक ताण घेऊन व्यसनाच्या आहारी गेला म्हणून त्याच्यावर मुक्तागंण पुणे येथे उपचार चालू आहे व त्याचा खर्च सामनेवाला क्र. २ व ३ करीत आहेत. त्यास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व शिक्षणदेखील नाही. त्याची उत्पन्न मिळवण्याची कुवत नाही, तो सामनेवाला क्र. २ व ३ यांचा आश्रीत म्हणून जगत आहे त्यामुळे त्यास पोटगी देणे शक्य नाही. अर्जदाराचे डी.फार्मचे शिक्षण सामनेवाला क्र. २ व ३ यांनी करुन दिले असून व्यवसायदेखील सुरु करण्यास ते तयार होते. अर्जदारास महमदाबाद येथील सुडके घराच्या शेतीत व संपत्तीत अविभक्त हिस्सा आहे, त्यामुळे तिला पोटगीची आवश्यकता नाही. करीता, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७. अर्जदार हिचे अर्जातील कथन व सामनेवाला यांचे म्हणणे, त्यांचा पुरावा व अर्जदार यांचा युक्तीवाद विचारात घेता, खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्याकरीता मी खालील कारणास्तव

निष्कर्ष नोंदवितो.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही तुर्तातुर्त पोटगी मिळण्यास पात्र आहे का? असल्यास रक्कम किती ? | **होय, रु.३५००/- दरमहा.** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.** |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र. १ साठी –**

**८.** सर्वप्रथम अर्जदार व सामनेवाला यांच्यामध्ये एकमेकांना कबूल असलेल्या गोष्टी नमूद करणे अपेक्षित आहे. अर्जदार व सामनेवाला क्र. १ हे पती पत्नी असून त्यांचा विवाह दि.०४.०६.२०१४ रोजी झाला आहे व सदर विवाहसंबंधातून त्यांना कोणतेही अपत्य नाही. अर्जदार व सामनेवाला यांच्यातील पती-पत्नीचे नाते आजही अस्तित्वात आहे याबाबत वाद नाही. अर्जदार व सामनेवाला हे एकमेकांचे नातेवाईक आहेत याबाबत वाद नाही.

**९.** अर्जदाराने सामनेवाला यांनी तिचा शारीरीक व मानसिक छळ केल्याबाबतचे व दि.२८.०९.२०२१ रोजी तिला मारहाण करुन हाकलून दिल्याचे कथन केले आहे. ही गोष्ट अर्जदाराने शपथपत्रावर नमुद केली आहे. पतीने पत्नीचा सांभाळ करणे, तिची देखभाल व व्यवस्था करणे हे कायदेशीर बंधनकारक आहे. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्यामध्ये पती-पत्नीचे नाते आजही अस्तित्वात आहे. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार ही सामनेवाला क्र.१ पासून मागील दीड वर्षांपासून विभक्त आहे ही बाब स्पष्ट आहे. दरम्यानच्या काळात सामनेवाला यांनी अर्जदाराची व्यवस्था, औषध पाणी, अन्न-वस्त्र-निवारा याबाबत कोणताही खर्च केल्याचे अभिलेखावर दिसून येत नाही. अशा

परिस्थितीमध्ये सामनेवाला क्र. १ याची अर्जदारचा पती म्हणून सांभाळ व व्यवस्था करण्याची जबाबदारी आहे, त्यामुळे अर्जदार ही सामनेवालाकडून पोटगी मिळणेस पात्र आहे.

**१०.** पोटगीच्या रक्कमेचा विचार करावयाचा झाल्यास अर्जदार व सामनेवाला यांचे उत्पन्न, पगार, विविध साधनापासून मिळणारे उत्पन्न, मुलभूत गरजांसाठी करावा लागणारा खर्च, अन्न-वस्त्र-निवारा यासाठी करावा लागणारा खर्च तसेच औषधपाणी, कपडालत्ता, प्रवास, मोबाईल, दुध, किराणा माल इ. साठी येणारा खर्च याचा विचार करणे अपेक्षित आहे. तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तु व सध्या वाढत्या महागाईमुळे वस्तुंच्या वाढत्या किंमतीचा विचार करणे देखील गरजेचे आहे.

**११.** अर्जदाराकडे तिचे कोणतेही स्वतंत्र उत्पन्नाचे साधन असल्याचे स्पष्ट होत नाही. अर्जदाराने सामनेवाला क्र.१ हा नोकरी करीत असल्याबाबतचा व त्यापासून त्याला मिळत असलेल्या उत्पन्नाबाबत पुरावा दाखल केला नाही. अर्जदाराने तिच्या अर्जात सामनेवाला क्र. २ हा सेवानिवृत्त असून त्याच्या नावावर मिळकती असल्याचे कथन केले आहे व त्याबाबत उतारेदेखील दाखल केले आहे. त्यामधून सामनेवाला क्र. १ यास उत्पन्न मिळत असेल, परंतु त्यास निश्चित किती उत्पन्न मिळते याबाबत अर्जदाराने कुठलाही सबळ पुरावा दाखल केलेला नाही. पती या नात्याने पत्नीचा सांभाळ करण्याची जबाबदारी ही सामनेवाला क्र. १ याच्यावर आहे. तसेच वरील सर्व गोष्टींचा विचार करता अर्जदारास रक्कम रु.३५००/- दरमहा पोटगी योग्य व कायदेशीर आहे असे माझे मत आहे. करिता मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दा क्र.२ साठी–**

**१२.** मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष पाहता, अर्जदार ही सामनेवाला क्र. १ कडून तुर्तातुर्त पोटगी मिळणेस पात्र

आहे. त्यामुळे अर्ज अंशतः मंजुर करत आहे. सबब, मुद्दा क्र. २ साठी मी खालील आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदारास तुर्तातुर्त पोटगी म्हणून दरमहा रक्कम रु.३५००/- प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून ते मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत देणेचे आहे.

३. सामनेवाला क्र. १ याने आज अखेर देणे असलेली पूर्ण पोटगीची रक्कम, प्रस्तुतचा आदेश पारित केल्यापासून एका महिन्याच्या आत अर्जदाराला देण्याचे आहे.

४. प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यास विनामूल्य देण्यात यावी व एक प्रत संबंधित पोलीस स्टेशनला पाठविण्यात यावी.

दि. २१.०८.२०२३

(पी.पी.बागुल)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
मंगळवेढा, जि. सोलापूर.